# ब्रेकफास्ट with nature

खारफुटी म्हणजे बिनकामाची झुडपं, खारफुटी म्हणजे दलदल, खारफुटी म्हणजे प्लास्टिकच्या पिशव्यांचा साचलेला खच, खारफुटी म्हणजे सर्वत्र घाण... मानवी अतिक्रमणांमुळे सर्वसामान्यांसमोर खारफुटीचे हे असं गलिच्छ चित्रं उभं राहतं. मात्र, प्रत्यक्षात खारफुटीच्या जंगलाची सैर म्हणजे एक अवर्णनीय आनंद असतो. वाईल्ड लाईफ वीकचं औचित्य साधून विक्रोळीतल्या गोदरेज मॅनग्रोव्हज सेण्टरने पर्यावरण प्रेमींना पर्यावरणाचा हा खजिना जवळून पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

विक्रोळीच्या गोदरेज कंपनीच्या आवारातील सुमारे पाऊणे दोन हजार एकर एवढ्या विस्तीर्ण जागेत नैसर्गिक चमत्कार आणि जैविक साधनसंपत्तीने खचाखच भरलेलं खारफुटींचं जंगल उभं आहे. तिथेच हे सारे कार्यक्रम रंगणार आहेत. १ ऑक्टोबरला दुपारी ४ वाजता ॲनिमल, बर्ड रेस्क्यू ॲन्ड फर्स्ट एड फॉर इन्ज्यूअर्ड बर्ड या विषयावर डॉ. बकले मार्गदर्शन करणार आहेत. जखमी प्राण्याची निगा, त्यांचं खाणं, त्यांच्यावरचे उपचार यावर ते बोलणार आहेत. २ तारखेला सकाळी ८ वाजता खाडी किनाऱ्यांवरील पक्षी निरिक्षणासाठी नेचर ट्रेल निघणार आहे. पाण्याबाहेरच्या चिखलातही श्वासोच्छवास करू शकणारा निवटी मासा, एक नांगी असलेला फिडलर खेकडा, डोक्यावर काळी टोपी असलेला ब्लॅक हेडेड सिगल, प्रचंड वेगात उडणारे स्विस्ट आणि सिसलेट पक्षी, राजेशाही डौल असलेली ब्राह्मणी घार, डोक्यापासून पाठीपोटापर्यंत पांढरा आणि पंख विटकरी असलेला इम्पिरीअल ईगल, पांढऱ्या पोटाचा समुद्री गरुड, असंख्य बुलबुल आणि तब्बल २०७ प्रकारचे पक्षी, सुळे असलेलं डुक्कर, मुंगुस, साप, अजगर, अशी प्राणी-पक्षांची खाण या खारफुटीच्या जंगलात वास्तव्याला आहे. मिस्वाक ही नामांकीत टुथपेस्ट ज्या पानांपासून तयार केली जाते ते मिस्वाकचं झाडही इथे आहे. तीन पर्णिकांचं एक पान असलेले कॉमन डेरिफ वेल, काटेरी पान असलेलं मारंडी, सरपटणारा क्रिपर वेल, १० फूट उंच वाढणारं एलिफंट ग्रास अशी परिपूर्ण इको सिस्टिम येथे पहायला मिळते. खारफुटीच्या झाडांचे अनेक प्रकारही इथे पहायला मिळतील. प्राणीपक्षांच्या प्रत्यक्ष निरीक्षणासह त्यांची परिपूर्ण माहिती देण्यासाठी पक्षी तज्ज्ञांना पाचारण करण्यात आलं आहे. त्यानंतर दुपारी साडेतीन वाजता वन्डरफुल वर्ल्ड ऑफ बर्ड या विषयावरील एक स्लाईड शो दाखवला जाणार आहे. आदेश शिवकर हे सुप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ यावेळी पक्षांचे विविध प्रकार, त्यांच्या लकबी, त्यांचे आवाज अशी सारी मनोरंजक माहिती त्यात देतील.

३ ऑक्टोबर रोजी सर्पांच्या विविध जाती आणि तो मानवाचा शत्रू नसून मित्रच आहे हे पटवून देणारा एक स्लाईड शो आयोजीत करण्यात आला आहे. वाईल्ड लाईफ कन्झर्वेशन या विषयावरचे एक प्रदर्शनही इथे भरवण्यात आलं असून त्यात डब्ल्यूडब्ल्यूएफ, बीएनएचएस, सृष्टी ज्ञान आणि गोदरेज मॅनग्रोव्हज सेंटरच्या पर्यावरण प्रेमींनी सहभाग घेतला आहे. दुपारी २ ते ६ या वेळात हे प्रदर्शन पाहता येणार असून त्यात पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारे पोस्टर्स, टी शर्ट, टोप्या, चित्र आणि फोटो मांडण्यात येणार आहेत. तर ४ तारखेला ब्रेकफास्ट विथ ब्युटीफुल बटरफ्लाईज ही खास फुलपाखरांचं दर्शन घडवणारी नेचर ट्रेल आयोजित करण्यात आली आहे. असंख्य प्रकारची आणि विशेषत: खारफुटीच्या जंगलात आढळणारी फुलपाखरं पाहता येणार आहे. त्यानंतर . आर. अरुण एक स्पेशल स्लाईड शो सादर करणार आहेत. हे सर्व कार्यक्रम गोदरेजच्या विक्रोळी इथल्या मॅनग्रोव्हज सेण्टरमध्ये होणार असून त्यात सर्वांना सहभागी होता येणार आहे. हे कार्यक्रम विनामूल्य आहेत. परंतु, सहभागासाठी पूर्व नोंदणी आवश्यक असून गोदरेज मॅनग्रोव्हज सेण्टरच्या माया महाजन (६७९६२०७७) किंवा हेमंत कारखानीस (९८१९७०५४८५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.

*mumbaitimes@indiatimes.com*







# आनंद जंगल सफारींचा

बच्चे कंपनीपासून ते जेष्ठ नागरीकांपर्यंत साऱ्यांनाच जंगलातील सफारीचा आनंद लुटण्याची संधी ठाणे वनविभाग, हरियाली आणि सामाजिक वनीकरण विभागाने उपलब्ध करुन दिली आहे. तानसा, फणसाड आणि कर्नाळा या अभयअरण्यांमध्ये या खास जंगल वाचन सफारींचं आयोजन करण्यात आलं आहे. १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान निघणाऱ्या या सहलींमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी पक्षी आणि वनस्पती शास्त्रातील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत.

हरियालीच्या हरित सेनेच्या माध्यमातून जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांसाठी या अभय अरण्यांतील प्रवेश शुल्क माफ करण्यात आलं आहे. त्यासाठी या विद्यार्थांनी शाळेतील मुख्याध्यापक आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांचं पत्र आणणं आवश्यक आहे. २५-२५ विद्यार्थ्यांच्या गटाला या सहलींमध्ये सहभागी केलं जाईल. विद्यार्थ्यांव्यतीरीक्त येणाऱ्या इतरांना त्या त्या अभय अरण्यांच्या नियमांनुसार शुल्क भरावं लागेल.

१ आणि २ ऑक्टोबर रोजी जेष्ठ नागरीकांसाठी एक रात्र आणि दोन दिवसांसाठी रायगड जिल्ह्यातील फणसाड अभयअरण्यात एका विशेष सहलीचं आयोजन करण्यात आलं आहे. त्या सहलीसाठी खास बस आणि अभय अरण्यातील रेस्ट हाऊसमध्ये राहण्याची सोयही केली जाणार आहे. या सर्व सहलींच्या माहितीसाठी हेमंत गुप्ते (९३२२३०८२९२), मधुकर दाते (९८६९८२५८२०) यांच्याशी संपर्क साधता येईल.

*mumbaitimes@indiatimes.com*